॥ राया अशी जवळ मला घ्याल का? ॥

गायिकाः क्षमा बाजीकर
गीतः शांता शेळके
संगीतः पं. जितेंद्र अभिषेकी
नाटकः हे बंध रेशमाचे

दिवस आजचा असाच गेला
उद्या तरी याल का?
राया अशी जवळ मला घ्याल का? ॥ धृ. ॥

पैठणी जांभळी जरीबुंद नेसुनी
मी वाट पाहते केव्हाची बैसुनी
ही घडीमागुनी घडी चालली सुनी
जागरणाने जळती डोळे। काजळ घालाल का? ॥ १ ॥

किती किती योजले होते बोलायचे
मज गूज मनीचे होते खोलायचे
संगतीत तुमच्या होते उमलायचे
कळ्या आजच्या शिळ्या उद्याला। ओठाशी न्याल का? ॥ २ ॥

या सरत्या राती तळमळते मी अशी
लोळते पलंगी पुन्हा बदलते कुशी
मज रुते बिछाना, नको नको ही उशी
हवा वाटतो हात उशाला। सजणा तुम्हि द्याल का? ॥ ३ ॥